॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 | **Academic-1 (BOS) Section** | website: srtmun.ac.in

Phone: (02462)215542 | E-mail: bos@srtmun.ac.in

**CBCS पॅटर्नुसार प्रथम व द्वितीय वर्ष उत्तीर्ण विद्यार्थ्यांना CBCS पॅटर्नुसार तृतीय वर्षात प्रवेश देण्यासंदर्भात नियमावली.**

## प रि प त्र क

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, दिनांक १७ जुलै २०२६ रोजी संपन्न झालेल्या मा.विद्यापरिषद बैठकीतील **विषय क्र.०९/६५–२०२६** अन्वये गठीत समितीच्या शिफारशीनुसार व मा.कुलगुरू महोदयांनी मान्यता प्रदान केल्याप्रमाणे **CBCS** पॅटर्न प्रथम, द्वितीय वर्षातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना **CBCS** पॅटर्नुसार तृतीय वर्षात प्रवेश देण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, अभ्यासक्रमाची सलगता व प्रशासकीय सुसूत्रता लक्षात घेऊन CBCS पॅटर्न मध्ये तृतीय वर्षात प्रवेश देण्यासंदर्भात खालील प्रमाणे नियमावली जाहीर करण्यात येत आहे.

- **CBCS पॅटर्न मध्येच तृतीय वर्षात प्रवेश देण्यात यावा** : ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय वर्षाचा अभ्यासक्रम CBCS पॅटर्नुसार पूर्ण केला आहे. त्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षातही CBCS पॅटर्नुसारच प्रवेश देण्यात यावा. यामुळे विद्यार्थ्यांना पदवी पूर्ण करण्याच्या प्रक्रियेत सातत्य राहील तसेच गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्र व शैक्षणिक नोंदीमध्ये कोणतीही विसंगती निर्माण होणार नाही.
- **विद्यार्थ्यांवरील अतिरिक्त शैक्षणिक भार टाळण्यात यावा** : CBCS पॅटर्नमधील विद्यार्थ्यांना तृतीय वर्षासाठी एनईपी पॅटर्नमध्ये प्रवेश दिल्यास त्यांना प्रथम व द्वितीय वर्षातील विविध व्हर्टिकल (Verticals) अंतर्गत राहिलेले सुमारे १० विषयांचे २० क्रेडिट्स पुन्हा पूर्ण करावे लागतील. यामुळे विद्यार्थ्यांवर अतिरिक्त शैक्षणिक भार पडेल, आर्थिक व मानसिक अडचणी निर्माण होतील आणि या निर्णयाला विद्यार्थ्यांकडून विरोध होण्याची शक्यता आहे.
- **अभ्यासक्रमातील साम्य व अध्यापनाची व्यवस्था** : सर्व विद्याशाखांतील CBCS व NEP अभ्यासक्रमाची तुलना केल्यानंतर तसेच अभ्यासमंडळाच्या अध्यक्षांनी चर्चा केल्यानंतर दोन्ही अभ्यासक्रमांमध्ये साधारणतः ६० ते ८० टक्के साम्य असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे CBCS पॅटर्नमधील विद्यार्थ्यांनी त्यांच्या मुख्य विषयांच्या तासिका NEP वेळापत्रकानुसार उपस्थित राहिल्यास CBCS अभ्यासक्रम प्रभावीपणे पूर्ण होऊ शकतो. अशा विद्यार्थ्यांना संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करून घेण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.
- **परीक्षा CBCS पॅटर्नुसार घेण्यात यावी** : अशा विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्या परिक्षा विभागामार्फत CBCS अभ्यासक्रमानुसार प्रश्नपत्रिका तयार करून परिक्षा घेण्यात यावी. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांनी ज्या अभ्यासक्रमानुसार शिक्षण घेतले आहे त्याच पध्दतीने परिक्षा देता येईल.
- **महाविद्यालय स्तरावर स्वतंत्र वेळापत्रकाची तरतूद** : महाविद्यालयांनी तासिका वेळापत्रक तयार करताना CBCS पॅटर्नमधील विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची विशेष दक्षता

Scanned with OKEN Scanner

॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572

## Academic-1 (BOS) Section

website: srtmun.ac.in

Phone: (02462)215542

E-mail: bos@srtmun.ac.in

घ्यावी. आवश्यकतेनुसार स्वतंत्र अथवा पूरक वेळापत्रक तयार करण्याचे अधिकार व जबाबदारी संबंधित प्राचार्यांना देण्यात येत आहे.

• **अंतिम संधीबाबत स्पष्ट तरतूद** : CBCS पॅटर्नमधील विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी हिवाळी–२०२८ पर्यंत संधी राहतील, त्यानंतरही संबंधित विद्यार्थी पदवी पूर्ण करू शकला नाही, तर त्यास पूर्णपणे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नुसार प्रथम वर्षापासून लागू असलेल्या नियमांनुसारच पुढील प्रवेश व परीक्षा प्रक्रिया पूर्ण करावी लागेल, असे स्पष्टपणे नमूद करण्यात येत आहे.

सदरील परिपत्रक CBCS पॅटर्ननुसार पदवी प्रथम, द्वितीय वर्षात उत्तीर्ण होऊन CBCS पॅटर्ननुसार तृतीय वर्षात प्रवेश घेत असलेले विद्यार्थी, प्राध्यापक व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे, हि विनंती.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड — ४३१ ६०६.
जा.क्र.:शै–१/परिपत्रक/पदवी/CBCS/२०२६–२७/126
दिनांक : ०५.०८.२०२६

उपकुलसचिव
शैक्षणिक (१–अभ्यासमंडळे) विभाग

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :–
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३) मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
५) मा. प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
६) मा.संचालक, सर्व संकुले व उपपरिसर, प्रस्तुत विद्यापीठ.
६) सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ. यांना देवून कळविण्यात येते की, परिपत्रक अभ्यासक्रम संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.

Scanned with OKEN Scanner